# बृहन्मुंबई महानगरपालिका
## परिपत्रक

विषय:- मंगळवार दि. १९.०८.२०२५ रोजीची सुट्टी

संदर्भ:- १. बृहन्मुंबई महानगरपालिका जनसंपर्क विभाग यांची Press Note (जसंवि/२६८)

२. परिपत्रक क्र.प्रकाअ/०९, दि.१३.०१.२०२५

उपरोक्त संदर्भित विषयांन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व खाते/विभाग/रूग्णालय प्रमुख यांना पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

भारतीय हवामान खात्याने मंगळवार, दि.१९.०८.२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात (मुंबई शहर अणि उपनगरे) अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला होता. त्याप्रमाणे, मुंबईत सातत्याने पाऊस कोसळत होता. म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका जनसंपर्क विभाग यांच्या Press Note क्र.जसंवि/२६८ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अत्यावश्यक सेवा वगळता इतर शासकीय/ निमशासकीय कार्यालय तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय यांना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारण या नात्याने सुट्टी जाहिर करण्यात आली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील खाते/ विभाग/ रूग्णालय यांची कार्यालये ही मुंबई शहर, उपनगर, व ठाणे जिल्हयात स्थित आहेत, त्यामुळे त्या ठिकाणी येणारा कामगार/कर्मचारी/अधिकारी वर्ग हा मुंबई व मुंबई बाहेरील शहर/गावांमधून प्रवास करीत असतात. सदर रोजी अति मुसळधार पावसामुळे प्रवासाची व्यवस्था नव्हती. त्यामुळे त्यांना त्यांच्या कार्यस्थळी वेळेत पोहचणे शक्य नव्हते. म्हणून मंगळवार दि.१९.०८.२०२५ रोजीच्या अनुषंगाने पुढील सूचना देण्यात येत आहेत.

1) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खाते/विभाग/रूग्णालय यांना (अत्यावश्यक सेवेतील कार्यालये वगळता) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारण या नात्याने मंगळवार, दि. १९.०८.२०२५ रोजी सुट्टी राहिल.

2) परिपत्रक क्र.प्रकाअ/०९, दि.१३.०१.२०२५ अन्वये नमूद केल्याप्रमाणे, ज्या कामगारांना १६ सार्वजनिक सुट्टया देण्यात येतात, अशा कामगारांना मंगळवार, दि. १९.०८.२०२५ रोजी सुट्टी राहिल. तसेच जे कामगार/कर्मचारी कामावर उपस्थित होते, त्यांना एलओ/१० च्या उपरोक्त संदर्भित ०२ अन्वये अर्जित रजेचा लाभ अनुज्ञेय राहिल.

प्रस्तुत परिपत्रक http://portal.mcgm.gov.in आणि http://mybmcemp.mcgm.gov.in/circular या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात येत आहे.

सही/- २९.०८.२०२५
(शारदा शा.गोसावी)
प्रमुख कर्मचारी अधिकारी

सही/- ०१.०९.२०२५
(श्री. सुनिल तु. जांगळे)
प्रमुख कामगार अधिकारी

सही/- ०३.०९.२०२५
(किशोर गांधी)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)

सही/- ०५.०९.२०२५
(डॉ.अश्विनी जोशी)
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)

सही/- १२.०९.२०२५
(भूषण गगराणी)
महानगरपालिका आयुक्त

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक:प्रकअ/ १९४ /सर्वसा (एमओपी/२३२)
दिनांक: दि. १६ सप्टेंबर २०२५

प्रत-------------------------------------------------------(जादा----------- प्रतीसह)

माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

L.L. Cardoza 16/9/25

(श्रीम. लिआना लॉ. कार्डोझ)
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**जनसंपर्क विभाग**

**दिनांक १९ ऑगस्ट २०२५**

**मुंबईतील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये यांना आज दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी सुटी**

**खासगी कार्यालये/ आस्थापनांनी आपल्या कर्मचाऱ्यांना घरी राहून कामकाज (वर्क फ्रॉम होम) करण्याच्या सूचना द्याव्यात**

भारतीय हवामान खात्याने आज मंगळवार, दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात (मुंबई शहर आणि उपनगरे) अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला आहे. त्याचप्रमाणे, मुंबईत सातत्याने पाऊस कोसळतो आहे.

या पार्श्वभूमीवर, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अत्यावश्यक सेवा वगळता, इतर सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालये यांना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या नात्याने महानगरपालिकेकडून आज सुटी जाहीर करण्यात येत आहे.

तसेच, मुंबई महानगरातील सर्व खासगी कार्यालये, आस्थापना यांनी आपल्या कामकाजाच्या स्वरूपानुसार, कर्मचाऱ्यांना घरी राहून कामकाज (वर्क फ्रॉम होम) करण्याच्या आणि अनावश्यक प्रवास टाळण्याच्या सूचना तातडीने द्याव्यात, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

★

(जसंवि/२६८)

९-३

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कामगार विभाग

प्रकाअ/ ०९ — परिपत्रक — दि.१३.०१.२०२५

२०२४-२०२५

विषयः- सन २०२५ या सालाकरिता महानगरपालिका कामगारांना द्यावयाच्या सार्वजनिक सुट्टयांबाबत.

संदर्भः-1) एलओ/१० दि.०९.०८.१९८८

2) प्रकाअ/०३ दि.०१.०१.२०२४

3)प्रकाअ/५१७ दि.०८.०९.२०२२

उपरोक्त संदर्भ क्र.1 नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील कामगारांना २०२५ या सालाकरीता सार्वजनिक सुट्टयांपैकी खालील 12 सुट्टया मिळतील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी , २०२५ | बुधवार |
| २) | होळी (दुसरा दिवस) | १४ मार्च , २०२५ | शुक्रवार |
| ३) | रमझान ईद (इद-उल-फितर) (शव्वल) (1) | ३१ मार्च , २०२५ | सोमवार |
| ४) | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२५ | सोमवार |
| ५) | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०२५ | गुरूवार |
| ६) | बुध्द पौर्णिमा | १२ मे, २०२५ | सोमवार |
| ७) | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०२५ | शुक्रवार |
| ८) | गणेश चतुर्थी | २७ ऑगस्ट,२०२५ | बुधवार |
| ९) | महात्मा गांधी जयंती/दसरा | ०२ ऑक्टोबर, २०२५ | गुरूवार |
| १०) | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | २१ ऑक्टोबर, २०२५ | मंगळवार |
| ११) | गुरूनानक जयंती | ०५ नोव्हेंबर २०२५ | बुधवार |
| १२) | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०२५ | गुरूवार |

2. किटकनाशक अधिकारी, कार्यकारी अभियंता परिवहन (शहर, उपनगरे आणि पापुमनि), प्रमुख अभियंता (मलनि:स्सारण प्रचालने), उद्यान अधिक्षक इ. खात्यामध्ये काम करणा-या कामगारांना त्याचप्रमाणे ज्या कामगारांना सध्या १६ सुट्टया देण्यात येतात, अशा खात्यातील कामगारांना उपरोक्त १२ सुट्टया अधिक खाली नमूद केलेल्या ४ सुट्टया मिळतील.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | महाशिवरात्री | २६ फेब्रुवारी,२०२५ | बुधवार |
| 2) | महावीर जयंती | १० एप्रिल ,२०२५ | गरूवार |
| 3) | ईद-ए-मिलाद | ०५ सप्टेंबर ,२०२५ | शुक्रवार |
| 4) | दिवाळी (बलिप्रतिपदा) | २२ ऑक्टोबर, २०२५ | बुधवार |

३. घन कचरा व्यवस्थापन खाते, सुरक्षा खाते, पाणी खात्यातील जलवाटप नियंत्रण (शहर) खात्यातील कामगारांना आणि मुंबई अग्निशमन दलातील प्रत्यक्ष कार्यवाहीवरील ८ तास पाळीपद्धतीतील (अधिकारी व कर्मचारी) यांना सार्वजनिक सुट्टयांऐवजी २७ नैमित्तीक रजा दरवर्षी दिल्या जातात त्या ह्या ही वर्षी देखील दिल्या जातील.

४. ज्या कामगारांना रुढीप्रमाणे सार्वजनिक सुट्टयांचे फायदे मिळतात त्यांना सार्वजनिक सुट्टया त्यांच्या विभाग आणि खात्यातील पध्दतीनुसार मिळतील.

५. देवनार पशुवधगृह येथे आवश्यक सेवेत काम करणा-या कामगारांना पशुवधबंदीदिनाबाबत महाराष्ट्र राज्यशासन व महानगरपालिकेच्या ठरावानुसार सार्वजनिक सुट्टया महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृह जाहिर करतील.

६. अतिरिक्त जाहिर झालेल्या सार्वजनिक सुट्टया अत्यावश्यक सेवेमध्ये काम करणा-या कामगारांना लागू नाहीत. त्यामुळे अतिरिक्त जाहिर झालेल्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम केल्याबद्दल प्रत्येक सार्वजनिक सुट्टीच्या मोबदल्यात एक जादा अर्जित रजा सदर कामगारांच्या अर्जित रजेच्या खात्यामध्ये वर्षाच्या शेवटी जमा केली जाईल. तथापि कामगाराने सदर वर्षामध्ये विनावेतनी रजा घेतली असल्यास अर्जित रजेच्या खात्यामधून तेवढीच रजा कमी करण्यात येईल. कामगारांच्या अर्जित रजेच्या खात्यामध्ये अशा प्रकारे जमा करण्यात आलेल्या रजेबाबत दि.३१.०३.२०२६ पूर्वी कार्यवाही पूर्ण करावी. संबंधित खाते प्रमुख/विभाग प्रमुखांनी हे काम दि. ३१.०३.२०२६ पूर्वी पूर्ण केले आहे याची खात्री करावी.

७. मान.महानगरपालिका आयुक्त यांच्या आदेश क्र.एमजीसी /एफ/७६७६ दि.०७.०९.२०२२ अन्वये परिपत्रक क्र. प्रकाअ/५१७ दि.०८.०९.२०२२ नुसार निर्गमित केलेल्या सुचनांप्रमाणे, संबधित खाते/विभागातील कामगारांना राज्य शासनाने जाहिर केलेल्या अतिरिक्त सार्वजनिक सुट्टया उदा गोपाळकाला , (दहिहंडी),अनंत चतुर्दशी (गणेश विसर्जन) इत्यादी लागू राहतील.

८. प्रचलित पध्दतीनुसार पाळीमध्ये काम करणा-या कामगारांना चक्रांकित पध्दतीने मिळणा-या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी आल्यास त्या कामगारास त्या बदल्यात एक सुट्टी दिली जाईल.

सदर परिपत्रकाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://hrcircular.mcgm.gov.in/hr/circular/GAD/CHLO या संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध आहे.

सही/-०६.०१.२०२५
(सुनिल तु.जांगळे )
प्रमुख कामगार अधिकारी

सही/-०८.०१.२०२५
(किशोर गांधी )
उप आयुक्त (सा.प्र.)

प्रत:------------------------------------ माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रमुख कामगार अधिकारी यांजकरिता